जनमानसाचा निडर आवाज...

# पुणे प्राईम न्यूज

मुख्य संपादक : जनार्दन दांडगे




दैनिक | वर्ष १ | अंक १९० | शुक्रवार, ३० जानेवारी २०२६ | मूल्य : २ रु. | पाने : ४ | RNI NO - MAHMAR/2022/84210

# महाराष्ट्राचे लाडके उपमुख्यमंत्री अजित पवार अनंतात विलीन

## उपमुख्यमंत्री अजित पवारांना जनतेने बारामतीत दिला अखेरचा निरोप

## केंद्रीय गृहमंत्री शहांसह देशातील अनेक दिग्गज नेत्यांची उपस्थिती

**बारामती, ता. २९ :** महाराष्ट्राच्या राजकारणातील एक प्रभावी अध्याय आज कायमचा बंद झाला. राज्याचे लाडके नेतृत्व, उपमुख्यमंत्री अजित पवार यांना गुरुवारी (ता. २९) दुपारी बारामतीतील विद्या प्रतिष्ठानच्या मैदानावर शासकीय इतमामात अखेरचा निरोप देण्यात आला. लाखो डोळ्यांत अश्रू, कंठ दाटलेले, आणि अजितदादा अमर रहेच्या घोषणांत संपूर्ण महाराष्ट्राने आपल्या दिग्गज नेत्याला साश्रू नमन केले.

चार दशकांहून अधिक काळ राज्याच्या राजकारणावर ठसा उमटवणारे अजित पर्व आज अनंतात विलीन झाले, अशी भावना जनमानसात दाटून आली होती. त्यांच्या जाण्याने केवळ राजकीयच नव्हे, तर सहकार, सामाजिक, सांस्कृतिक आणि क्रीडा क्षेत्रालाही मोठा धक्का बसला आहे.




बुधवारी (ता. २८ जानेवारी) बारामती येथे झालेल्या दुर्दैवी विमान अपघातात अजित पवार यांचे निधन झाले होते. त्यानंतर त्यांचे पार्थिव अंत्यदर्शनासाठी ठेवण्यात आले असता, बारामतीसह राज्याच्या कानाकोपऱ्यातून कार्यकर्ते, समर्थक आणि सर्वसामान्य नागरिक मोठ्या संख्येने दाखल झाले. आमच्यासाठी रात्रंदिवस झटणारा, विकासाचा ध्यास घेतलेला नेता आम्ही गमावला, अशी भावना प्रत्येक चेहऱ्यावर उमटत होती.

गुरुवारी सकाळी अजित पवार यांचे पार्थिव त्यांच्या जन्मगावी काटेवाडी येथे नेण्यात आले. तेथे संपूर्ण गाव शोकसागरात बुडाले होते. अनेक घरांत चूल पेटली नव्हती; लहानांपासून वृद्धांपर्यंत प्रत्येकजण स्तब्ध होता. सकाळी ११ वाजता फुलांनी सजवलेल्या वाहनातून अंत्ययात्रेला सुरुवात झाली. रस्त्याच्या दुतर्फा हजारो नागरिक हात जोडून उभे होते. अनेकजण रडत, धावत आपल्या नेत्याची अखेरची झलक पाहण्याचा प्रयत्न करत होते.

अंत्ययात्रा विद्या प्रतिष्ठानच्या मैदानात पोहोचताच, लाखोंचा जनसागर एकवटला. शासकीय इतमामात पार पडलेल्या अंत्यविधीवेळी राज्य पोलीस दलाकडून हवेत गोळ्या झाडून मानवंदना देण्यात आली. मंत्रोच्चारांच्या घोषात पुत्र पार्थ पवार आणि जय पवार यांनी मुखाग्नी दिला. पत्नी खासदार सुनेत्रा पवार यांनी जड अंतःकरणाने अखेरचे दर्शन घेतले.

### लाडका दादा गेला

काटेवाडी येथील निवासस्थानातून विद्या प्रतिष्ठानच्या मैदानाकडे निघालेल्या अंत्ययात्रेदरम्यान लाखोंच्या संख्येने जमलेल्या जनसमुदायाने आमचा नेता गेला, लाडका दादा गेला, अजित पवार परत या, अजित पवार अमर रहे, बारामतीचा आधार गेला अशा घोषणा देत अश्रू ढाळले. राज्यभरातून आलेल्या महिलांनी आमचा भाऊ गेला, आमचा वाली गेला असे म्हणत हंबरडा फोडला. या शोकाकुल वातावरणात शासकीय इतमामात अजित पवार यांना सलामी देत मानवंदना देण्यात आली.

या वेळी केंद्रीय गृहमंत्री अमित शाह, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, केंद्रीय मंत्री नितीन गडकरी, छगन भुजबळ, पंकजा मुंडे, धनंजय मुंडे, रामदास आठवले, गोव्याचे मुख्यमंत्री प्रमोद सावंत, खासदार शाहू महाराज छत्रपती, हसन मुश्रीफ, मुरलीधर मोहोळ, चंद्रशेखर बावनकुळे, अदिती तटकरे, नीलम गोऱ्हे, महादेव जानकर, मेधा कुलकर्णी तसेच अभिनेता रितेश देशमुख यांच्यासह अनेक मान्यवरांनी पुष्पचक्र अर्पण करत श्रद्धांजली वाहिली आणि पवार कुटुंबीयांचे सांत्वन केले.

दरम्यान, दुपारच्या अंत्यसंस्कारानंतर अजित पवार अनंतात विलीन झाले असले, तरी महाराष्ट्राचा दादा म्हणून ओळखल्या जाणाऱ्या या नेत्याची आठवण, कार्य आणि प्रभाव राज्याच्या राजकारणावर कायम अधिराज्य गाजवत राहील, अशी भावना उपस्थित जनसमुदायातून व्यक्त होत होती.

## संक्षिप्त

### घरगुती भांडणात मध्यस्थी केल्याच्या रागातून तरुणाला बेदम मारहाण

**चाकण, ता. २९ :** नातेवाईकांच्या घरातील भांडण सोडवण्यासाठी गेलेल्या एका व्यक्तीला तिघांनी मिळून लाकडी दांडके आणि पाईपने मारहाण करून जखमी केले. ही घटना रविवारी रात्री साडेअकरा वाजता पगडे वस्ती, चऱ्होली खुर्द (ता. खेड) येथे घडली. या प्रकरणी हारून इमामउल्ला शहा (३६, सोळू खिंड, मरकळ) यांनी आळंदी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. पोलिसांनी आझादसिंह ध्यानसिंह संधू (३३), अमनदीप सत्यपाल सिंह संधू (२२) आणि सिमरनमीत सत्यपाल सिंह संधू (सर्व राहणार माऊली नगर, चऱ्होली खुर्द) या तिघांना अटक केली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, फिर्यादी हे त्यांच्या मेहुण्याकडे गेले होते. त्यावेळी आरोपींनी तू आमच्या घरातील भांडणात का पडतोस? असे म्हणून फिर्यादीला गाठले. त्यांनी फिर्यादीला लाथा-बुक्क्यांनी मारहाण केली तसेच प्लास्टिकचा पाईप आणि लाकडी दांडक्याने फिर्यादीच्या डोक्यावर व हातावर वार करून त्यांना जखमी केले. आळंदी पोलीस या प्रकरणाचा तपास करत आहेत.




### पिस्तुल आणि काडतुसासह दोघांना अटक

**खेड, ता. २९ :** विनापरवाना देशी बनावटीचे पिस्तुल आणि जिवंत काडतूस बाळगल्याप्रकरणी पोलिसांनी दोघांना अटक केली आहे. ही कारवाई मंगळवारी ( जानेवारी) रात्री इंदोरी बायपास येथे करण्यात आली.

सनी सुरेश शिंदे (३३, कान्हेवाडी, खेड) आणि अभिषेक अशोक येवले (कान्हेवाडी, खेड) अशी अटक केलेल्या आरोपींची नावे आहेत. पोलीस शिपाई वसीम शेख यांनी या प्रकरणी तळेगाव एम आयडीसी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे.पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, आरोपींकडे पिस्तुल असल्याची माहिती पोलिसांना मिळाली होती.

त्यानुसार सापळा लावून त्यांना ताब्यात घेण्यात आले. त्यांच्याकडून ३० हजार रुपये किमतीचे पिस्तुल, १ हजार रुपयांचे जिवंत काडतूस आणि साडेसहा लाख रुपये किमतीची मोटार असा एकूण ६ लाख ८१ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. तळेगाव एमआयडीसी पोलीस तपास करत आहेत.

# अजित पवारांचा भावनिक किस्सा सांगताना आमदार अमोल मिटकरी ढसाढसा रडले

**पुणे, ता. २९ :** राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे बुधवारी २८ जानेवारी रोजी विमान दुर्घटनेत दुर्दैवी निधन झाले. गुरुवारी बारामतीतील विद्या प्रतिष्ठानच्या प्रांगणात शासकीय इतमामात, अत्यंत शोकाकूल वातावरणात त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले.

अजित पवार यांच्या पार्थिवाला त्यांचे चिरंजीव पार्थ पवार आणि जय पवार यांनी मुखाग्नी दिला. हजारो समर्थक, कार्यकर्ते आणि नागरिकांनी अजित दादा अमर रहेच्या घोषणांत आपल्या लाडक्या नेत्याला अखेरचा निरोप दिला.

या दुःखद घटनेने राज्यभरात हळहळ व्यक्त होत असतानाच, उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्याशी जवळचा राजकीय आणि वैयक्तिक संबंध असलेल्या आमदार अमोल मिटकरी यांनाही मोठा धक्का बसला आहे. अजित पवार यांच्यासोबतचे जुने दिवस आठवत अमोल मिटकरी यांनी भावनिक शब्दांत एक खास किस्सा सांगितला, जो उपस्थितांच्या डोळ्यांत पाणी आणणारा ठरला.



अमोल मिटकरी म्हणाले की, सुमारे ६ वर्षांपूर्वी ते भाड्याच्या घरात राहत होते. त्यावेळी अजित पवार यांचा अचानक फोन आला आणि तुला मी आमदार करणार आहे, कागदपत्रे घेऊन ये, असे त्यांनी सांगितले. मात्र, स्वतःकडे कोणतीही कागदपत्रे नसल्याचे सांगितल्यानंतरही अजित पवार यांनी वकील लावून सर्व प्रक्रिया पूर्ण करून घेतली. त्या दिवसापासून माझं आयुष्य बदललं, असे मिटकरी म्हणाले.

पुढील काही वर्षांत स्वतःचे घर झाल्याचा उल्लेख करत त्यांनी सांगितले की, त्या घरामागे अजित पवार यांची पुण्याई आहे. घराच्या वास्तुशांतीसाठी अजित पवार येऊ शकले नाहीत, याची आठवण सांगताना त्यांचा आवाज भरून आला. दादा आले नाहीत म्हणून मी देवगिरीला जाऊन त्यांच्या चप्पला आणल्या आणि त्या चप्पलांची पूजा घरात केली, असा प्रसंग सांगताना अमोल मिटकरी अक्षरशः धाय मोकलून रडले.

# ज्वेलर्सला भररस्त्यात अडवून जीवे मारहाण करुन लुटण्याचा प्रयत्न

**पुणे, ता. २९ :** पुण्यातील कात्रज परिसरात एका ज्वेलर्सवर जीवघेणा हल्ला झाल्याची गंभीर घटना समोर आली असून, शहरातील व्यापाऱ्यांच्या सुरक्षेचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे. दुकान बंद करून घरी जात असताना दुचाकीवरून आलेल्या तिघा चोरट्यांनी ज्वेलर्सला अडवून लोखंडी हत्याराने बेदम मारहाण केली. या हल्ल्यात ज्वेलर्स गंभीर जखमी झाले असून त्यांच्यावर सध्या रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

भरतसिंह मानसिंग जोधा राठोड (वय ४३, रा. सुखसागरनगर, कात्रज) असे जखमी ज्वेलर्सचे नाव आहे. अपर इंदिरानगर परिसरात त्यांचे दागिन्यांचे दुकान असून २७ जानेवारी रोजी रात्री सुमारे १० वाजण्याच्या सुमारास ते दुकान बंद करून घरी परतत होते. सुखसागरनगरमधील




महाराणी साडी दुकानाजवळ पोहोचताच दुचाकीवरून आलेल्या तिघा अज्ञातांनी त्यांना अडवले. सुरुवातीला हाताने मारहाण करत अचानक लोखंडी हत्याराने त्यांच्या डोक्यावर आणि दोन्ही हातांवर वार करण्यात आले. रक्तबंबाळ अवस्थेत त्यांना रस्त्यावर टाकून आरोपी घटनास्थळावरून पळून गेले.

या घटनेनंतर परिसरात एकच खळबळ उडाली. जखमी अवस्थेत भरतसिंह राठोड यांना तातडीने रुग्णालयात दाखल करण्यात आले. त्यांच्या भावाने सोमसिंह मानसिंह जोधा राठोड (वय ४३) यांनी बिबवेवाडी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली असून पोलिसांनी तिघा अज्ञातांविरोधात खुनाचा प्रयत्न केल्याचा गुन्हा दाखल केला आहे.

हा हल्ला चोरीच्या उद्देशाने करण्यात आला की वैयक्तिक वादातून, याचा तपास सुरू असून परिसरातील सीसीटीव्ही फुटेज तपासले जात आहे. व्यापाऱ्यांवर अशा प्रकारे उघडपणे होणारे हल्ले चिंताजनक असून, रात्रीच्या वेळेस सुरक्षेची ठोस व्यवस्था करण्याची मागणी स्थानिकांकडून केली जात आहे. पोलीस निरीक्षक सुरज बेंद्रे या प्रकरणाचा पुढील तपास करत आहेत.

# हिंगणी गाड्यात जाळीत अडकलेल्या चिकाऱ्या हरणाला जीवदान

## माजी सरपंच संजय गायकवाड यांची तत्परता

**दौंड, ता. २९ :** ग्रामीण भागात माणुसकी अजून जिवंत असल्याचे दर्शन घडविणारी घटना हिंगणी गाडा (ता. दौंड) येथील गायकवाड मळा परिसरात सोमवारी (ता. २७ जानेवारी २०२६) घडली. शेताच्या कडे असलेल्या जाळीमध्ये चिकाऱ्या जातीचे एक हरीण अडकून पडल्याची घटना समोर आली. या हरणाचे प्राण वाचविण्यासाठी गावकऱ्यांनी दाखवलेली तत्परता कौतुकास्पद ठरली आहे.

गायकवाड मळा परिसरात सकाळच्या सुमारास शेताची पाहणी करत असताना गावाचे माजी सरपंच संजय गायकवाड यांच्या निदर्शनास ही घटना आली. शेताच्या कडे असलेल्या लोखंडी जाळीत हरीण पूर्णपणे अडकले होते. हालचाल करण्याचा प्रयत्न करताना ते अधिकच गुतत चालले होते. ही बाब लक्षात



येताच संजय गायकवाड यांनी वेळ न दवडता गावातील सामाजिक कार्यकर्ते निलेश लोंढे व गोरख गायकवाड यांना याची माहिती दिली.


या घटनेची माहिती मिळताच निलेश लोंढे व गोरख गायकवाड तात्काळ घटनास्थळी दाखल झाले. कोणतीही भीती न बाळगता त्यांनी अत्यंत काळजीपूर्वक जाळी कापून हरणाला सोडविण्याचे काम हाती घेतले. काही वेळाच्या प्रयत्नानंतर हरीण जाळीतून सुखरूपपणे बाहेर काढण्यात यश आले. किरकोळ जखमा वगळता हरणाची प्रकृती स्थिर असल्याची खात्री झाल्यानंतर त्याला जवळच्या जंगल परिसरात सुरक्षिततीत्या सोडून देण्यात आले.

दरम्यान, या घटनेमुळे गावकऱ्यांमध्ये समाधानाचे वातावरण निर्माण झाले असून, मानव व वन्यजीव यांच्यातील सहअस्तित्वाचे सुंदर उदाहरण हिंगणी गाडा येथे पाहायला मिळाले. शेतकऱ्यांनी शेताच्या कडे असलेल्या जाळ्या व तारा लावताना वन्यजीवांच्या सुरक्षिततेचाही विचार करावा, अशी अपेक्षा नागरिकांनी व्यक्त केली आहे.

# प्रजासत्ताक दिन संचलनात महाराष्ट्राचा चित्ररथ देशात सर्वोत्कृष्ट

**नवी दिल्ली, २९ :** देशाच्या ७७ व्या प्रजासत्ताक दिनानिमित्त दिल्लीतील कर्तव्यपथावर पार पडलेल्या दिमाखदार सोहळ्यात महाराष्ट्राच्या सांस्कृतिक वैभवाचे सादरीकरण सर्वोत्कृष्ट ठरले आहे. यंदाच्या संचलनामध्ये राज्यांच्या चित्ररथांमध्ये महाराष्ट्राच्या चित्ररथाने प्रथम क्रमांक पटकावला आहे. केंद्र सरकारकडून या निकालांची अधिकृत घोषणा करण्यात आली असून, या गटात जम्मू-काश्मीर आणि केरळ या राज्यांनी अनुक्रमे द्वितीय आणि तृतीय क्रमांक पटकावला आहे.

यंदा महाराष्ट्राने गणेशोत्सवः आत्मनिर्भरतेचे प्रतीक या संकल्पनेवर आधारित चित्ररथ




सादर केला होता. या चित्ररथाच्या माध्यमातून महाराष्ट्राची समृद्ध लोकसंस्कृती, गणेशोत्सवाचा सामाजिक वारसा आणि त्यातून मिळणारा आर्थिक रोजगार व आत्म निर्भरतेचा संदेश अत्यंत प्रभावीपणे मांडण्यात आला होता. चित्ररथावरील भव्य गणेशमूर्ती, पारंपरिक ढोल-ताशा पथक आणि लेझीम खेळणाऱ्या कलाकारांच्या उत्साहाने कर्तव्यपथ दुमदुमून गेला होता. याच प्रभावी सादरीकरणामुळे परीक्षकांनी राज्य आणि केंद्रशासित प्रदेशांच्या गटातून महाराष्ट्राच्या चित्ररथाला सर्वोत्तम चित्ररथ म्हणून निवडले आहे. दरम्यान, केवळ राज्यांच्या श्रेणीतच नव्हे, तर इतर विभागांतही चुरस पाहायला मिळाली. यामध्ये सेना दलातून भारतीय नौदल तर निमलष्करी दलातून दिल्ली पोलीस यांच्या संचलन पथकाला सर्वोत्कृष्ट म्हणून गौरवण्यात आले. केंद्रीय मंत्रालयांच्या गटामध्ये सांस्कृतिक मंत्रालयाच्या चित्ररथाने बाजी मारली, तर केंद्रीय सार्वजनिक बांधकाम विभाग आणि वंदे मातरम् नृत्य समूहाला विशेष पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

## संक्षिप्त

### देशमुख, मुंडे आणि अजितदादा आमच्या बीडकरांना शाप आहे की काय : सुरेश धस



**बीड, ता. २९ :** राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांचा विमान अपघातात मृत्यू झाला. बारामती येथे विमानाचे लँडिग होत असताना त्यांचा अपघात झाला. हा अपघात इतका भीषण होता की विमान जळून खाक झाले आहे. त्यांच्या या अचानक घेतलेल्या एक्झिटने संपूर्ण महाराष्ट्र हळहळलाय. अनेक राजकीय नेत्यांनी त्यांच्या निधानावर शोक व्यक्त केला. भाजपचे नेते सुरेश धस यांनी देखील प्रसार माध्यमांशी संवाद साधत प्रतिक्रिया दिली आहे. अजित पवार यांच्याबद्दल बोलताना सुरेश धस म्हणाले, अजित पवारांच्या निधनाने महाराष्ट्राची मोठी हानी झाली आहे. पण आम्हाला शाप आहे की काय, असंच वाटायला लागलंय. याआधी विलासराव देशमुख आणि गोपीनाथराव मुंडे हेही काही काळ बीड जिल्ह्याचे पालकमंत्री होते आणि ते दोघेही अकाली गेले. आमचे दादा पालकमंत्री झाले आणि जिल्ह्यातील अनेक प्रलंबित प्रश्न मार्गी लागू लागले होते. विकासाची गती दिसू लागली होती. आता अजितदादाही आपल्यातून निघून गेले. ६७, ६६ आणि ६४ अशा वयात ही तीन मोठी नेतृत्वं हरपणं हे अत्यंत वेदनादायक आहे. हे आमचं बीड जिल्ह्याचं दुर्दैव आहे. कुठलाही प्रश्न त्यांच्या समोर मांडला की ते एक घावात दोन तुकडे करणारा निर्णय घ्यायचे. पोकळ आश्वासन देणारे ते कधीच नव्हते. काम होणार असेल तर स्पष्ट हो आणि नसेल तर ठाम नाही म्हणण्याची प्रामाणिकता त्यांच्यात होती, असेही यावेळी सुरेश धस म्हणाले.

### पोटच्या मुलीवर अत्याचार करणाऱ्या नराधम बापाला सक्तमजुरी

**सोलापूर, ता. २९ :** ज्या वडिलांनी लेकीचे रक्षण करायचे, त्याच बापाने वासनेच्या अंधारात नात्याला काळीमा फासल्याची धक्कादायक घटना सोलापूरमध्ये उघडकीस आली होती. या संतापजनक प्रकरणात आता कायद्याचा बडगा उगारला असून, विशेष न्यायालयाने नराधम बापाला २० वर्षे सक्तमजुरी आणि २० हजार रुपये दंडाची कठोर शिक्षा सुनावली आहे. विशेष न्यायाधीश बी.एन. सुरवसे यांनी दिलेला हा निकाल समाजात अशा प्रवृत्तींना एक मोठा इशारा देणारा ठरला आहे. जानेवारी २०२० मधील ही घटना आहे. पीडित मुलगी घरात एकटी असल्याचे पाहून नराधम बापाने तिच्यावर जबरदस्तीने अत्याचार केला. केवळ एकदाच नव्हे, तर दोन-तीन दिवसांनंतर पीडितेची मोठी बहीण घराबाहेर गेल्याची संधी साधून त्याने पुन्हा हे दुष्कृत्य केले. इतकेच नाही तर, हा प्रकार कोणाला सांगितल्यास गंभीर परिणाम भोगण्याची धमकीही त्याने मुलीला दिली होती. सोलापूर तालुका पोलिसांनी या प्रकरणात सखोल तपास करून वैद्यकीय पुरावे आणि साक्षीदार गोळा केले. सुनावणी दरम्यान सात महत्त्वाच्या साक्षीदारांच्या साक्षी नोंदवण्यात आल्या. न्यायालयाने मानवी स्वभाव आणि नात्याचा विश्वासघात लक्षात घेऊन आरोपीला कोणतीही दया न दाखवता सक्तमजुरीची शिक्षा सुनावली.

# जमिनीच्या नोटिसा रजिस्टर पोस्टाने; भूमी अभिलेख विभागाचा मोठा निर्णय

**पुणे, ता. २९ :** महाराष्ट्रातील महसूल प्रशासनात दीर्घकाळ चर्चेत असलेली नोटीस बजावणीची प्रक्रिया आता मोठ्या बदलाच्या उंबरठ्यावर आहे. सातबारा उताऱ्यातील फेरफार, जमीन व्यवहार, वारस नोंदी, न्यायालयीन आदेश आणि महाराष्ट्र महसूल संहितेतील अपिलांशी संबंधित नोटिसा देण्याची पद्धत आता थेट पोस्ट ऑफिसच्या ऑनलाइन प्रणालीद्वारे राबवली जाणार आहे. या बदलामुळे नोटीस मिळाली की नाही, यावरून होणारे वाद, तक्रारी आणि संशय मोठ्या प्रमाणात कमी होतील, असा प्रशासनाचा दावा आहे.



आतापर्यंत तलाठ्यांकडून प्रत्यक्ष जाऊन किंवा हातोहात नोटिसा दिल्या जात होत्या. प्रत्यक्षात ही प्रक्रिया अनेक अडचणींनी भरलेली होती. पक्षकार घरी नसणे, नोटीस स्वीकारण्यास नकार देणे किंवा नोटीस दिल्याचा दावा आणि नाकारण्याचे प्रकार वारंवार घडत होते. यामुळे एकीकडे नागरिकांमध्ये असंतोष निर्माण होत होता, तर दुसरीकडे तलाठ्यांवर अनावश्यक ताण वाढत होता. भूमी अभिलेख विभागाकडे या संदर्भात तलाठी आणि नागरिक, दोन्ही बाजूंनी मोठ्या प्रमाणात तक्रारी दाखल होत होत्या.

ही पार्श्वभूमी लक्षात घेऊन राज्य सरकारने पोस्ट ऑफिसच्या तंत्रज्ञानाधारित यंत्रणेचा वापर करण्याचा निर्णय घेतला आहे. नव्या व्यवस्थेनुसार तलाठ्याकडे आलेली नोटीस ऑनलाइन पद्धतीने पोस्ट ऑफिसकडे पाठवली जाईल. पोस्ट ऑफिस त्या नोटिसा प्रिंट करून रजिस्टर पोस्टाद्वारे संबंधित पक्षकारांना पाठवेल. पोस्टमनमार्फत नोटीस पोहोचवल्यानंतर त्याचा संपूर्ण डिजिटल रेकॉर्ड तयार होईल. नोटीस पाठवली गेली, वितरित झाली किंवा वितरणाचा प्रयत्न झाला, याची माहिती तलाठ्याला ऑनलाइन स्वरूपात मिळणार आहे.

नोटीसची पोच ऑनलाइन स्वरूपात उपलब्ध होणार असल्याने नोटीस मिळालीच नाही हा नेहमीचा वाद संपुष्टात येण्याची शक्यता आहे. जिल्हाधिकारी आणि वरिष्ठ अधिकारी या सर्व प्रक्रियेचे ट्रॅकिंग करू शकतील, त्यामुळे जबाबदारी निश्चित होईल. पुढील २ महिन्यांत ही प्रणाली राज्यातील सर्व गावांमध्ये लागू करण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे.

या बदलामुळे महसूल आणि न्यायालयीन कामकाजातील विलंब कमी होईल, नागरिकांना वेळेवर माहिती मिळेल आणि एकूणच महसूल प्रशासन अधिक पारदर्शक व विश्वासार्ह बनेल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

### ध्वजारोहणाच्या कार्यक्रमात मानावरून दोन गटात राडा

**तळेगाव, ता. २९ :** प्रजासत्ताक दिनाच्या कार्यक्रमात मान देण्यावरून दोन गटात राडा झाला. या प्रकरणी परस्पर विरोधात गुन्ह्याची नोंद करण्यात आली आहे. यामध्ये उपसरपंच महिलेच्या पतीसह दोन्ही बाजूच्या १५ जणांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही घटना सोमवारी (२६जानेवारी) मावळ तालुक्यातील धामणे गावात घडली. पहिल्या प्रकरणात ४२ वर्षीय व्यक्तीने फिर्याद दिली आहे. त्यानुसार एक महिलेसह आठ जणांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. धामणे गावामध्ये प्रजासत्ताक दिनाच्या दिवशी ध्वजारोहणावरून उपसरपंच आणि ग्रामपंचायत सदस्य असलेल्या महिलेमध्ये मान देण्यावरून वाद झाला. या कारणावरून ग्रामपंचायत सदस्य असलेल्या महिलेच्या कुटुंबातील सदस्यांनी उपसरचपंच महिलेच्या फिर्यादी असलेल्या नातेवाईकाच्या घरात जबरदस्तीने प्रवेश केला.

# अजित पवारांच्या अपघाती निधनामुळे राज्य क्रीडाक्षेत्रावर शोककळा

**मुंबई, ता. २९ :** महाराष्ट्राच्या क्रीडाक्षेत्राच्या राजकारणात अजितदादांचा शब्द अंतिम मानला जायचा. त्यांची इतकी दहशत. इतका दरारा होता की, तो प्रत्येकाला हवाहवासा वाटायचा. कारण तो दरारा खेळाडूंना दाबणारा नव्हे तर व्यवस्थेला शिस्तीत आणणारा होता. आज कबड्डीची दादागिरी संपलीय. त्यांच्या निधनाने कबड्डीपटू, कबड्डी संघटक आणि कबड्डीप्रेमी आज अनाथ झालेत, अशा शब्दांत आज प्रत्येक कबड्डीवाल्यांचे डोळे पाणावले होते. त्यांच्या निधनामुळे कबड्डी-खोखोच नव्हे तर अवघ्या क्रीडा क्षेत्रावर शोककळा पसरली आहे.



अजित पवार यांच्या अध्यक्षतेखाली महाराष्ट्राची कबड्डी मजबूत झाली, सक्षम झाली, श्रीमंत झाली. त्यांच्या रूपाने महाराष्ट्र ऑलिम्पिक संघटनेलाही अध्यक्ष लाभले होते. ते खो-खो संघटनेचेही कर्णधार होते. ते खर्या अर्थाने मैदानातले कर्णधार (अध्यक्ष) होते, अशी भावनिक प्रतिक्रिया ज्येष्ठ कबड्डीपटू राणाप्रताप तिवारी यांनी व्यक्त केली. ते खूर्चीवर बसून खेळ बघणारे नव्हते. ते मैदानावर उतरून डाव ठरवणारे होते. कुठे निधी जायचा, कुठे थांबायचा, कुठे शिस्त लावायची हे निर्णय ते फाईल उघडण्याआधीच घ्यायचे. कबड्डीत काही झालं की आम्ही त्यांच्याकडेच धावायचो. आमची आपापसांत सुरू असलेली भांडणं-वाद यापुढे कोण सोडवणार, याची आतापासूनच काळजी वाटतेय, असेही तिवारी म्हणाले.

> दादांच्या जाण्याने आम्ही आमच्या कुटुंबातील एक वडीलधारी व्यक्ती गमावलीय. खेळ आणि खेळाडूंना आश्रयदाता गमावलाय. गेली २५-३० वर्षे दादांशी अनेक क्रीडा संस्थाच्या माध्यमातून संपर्क येत होता. खेळाची जाण असलेला आणि खेळ आणि खेळाडूंना मानसन्मान मिळवून देणारा नेता नव्हे नेतृत्व आम्ही गमावलेय.
> - **संजय शेटे,** सरचिटणीस, महाराष्ट्र ऑलिम्पिक संघटना

> महाराष्ट्राच्या क्रीडाक्षेत्रातील देशी खेळांचे विशेष करून खोखो, कबड्डी, कुस्ती या खेळाचे अजितदादा हे तारणहार होते. त्यांच्या पाठिंब्यामुळे देशी खेळांना बळ लाभले. पण त्यांच्या निधनामुळे महाराष्ट्राच्या क्रीडा जगताची अपरिमित हानी झाली आहे. देशी खेळ पोरके झाले आहेत. अशा या उत्तुंग नेतृत्वास भावपूर्ण श्रद्धांजली.
> - **चंद्रजीत जाधव,** (प्रमुख कार्यवाह, राज्य खो-खो संघटना)

### पुण्यात बनावट चावीने पेट्रोल पंपाचा लॉकर फोडून सव्वासहा लाखांवर डल्ला

**पुणे, ता. २९ :** पुणे शहरातून चोरीची आणखी एक गंभीर घटना समोर आली असून, विमानतळ रस्त्यावरील एका पेट्रोल पंपावर मोठ्या रकमेची चोरी झाल्याने खळबळ उडाली आहे.

विश्रांतवाडी परिसरात असलेल्या एका पेट्रोल पंपाच्या कार्यालयातील लॉकर उघडून चोरट्याने ६ लाख २५ हजार रुपये रोख रक्कम चोरून नेल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. या प्रकरणी विश्रांतवाडी पोलीस ठाण्यात अज्ञात व्यक्तीविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, ही घटना २६ जानेवारीच्या मध्यरात्री घडली. संबंधित पेट्रोल पंपाच्या कार्यालयात चोरट्याने कुठलीही तोडफोड न करता प्रवेश केला. त्यानंतर त्याने बनावट चावीच्या मदतीने कार्यालयातील लॉकर उघडला. लॉकरमध्ये ठेवलेली सव्वासहा लाख रुपयांची रोकड घेऊन चोरटा निघून गेला. कुठल्याही प्रकारची तोडफोड न झाल्याने चोरीचा प्रकार लगेच लक्षात आला नाही.

२७ जानेवारी रोजी सकाळच्या सुमारास कर्मचारी कामावर आले असता लॉकरमधील रोकड गायब असल्याचे त्यांच्या निदर्शनास आले. ही बाब समजताच पंप व्यवस्थापनाने तातडीने पोलिसांना माहिती दिली. या घटनेनंतर परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. या प्रकरणी टिंगरेनगर परिसरात राहणाऱ्या ४३ वर्षीय महिलेने पोलिसांत तक्रार दिली आहे. माहिती मिळताच विश्रांतवाडी पोलिसांनी घटनास्थळी भेट देऊन पंचनामा केला. पेट्रोल पंपाच्या परिसरातील तसेच रस्त्यावरील सीसीटीव्ही कॅमेऱ्यांचे फुटेज तपासासाठी ताब्यात घेण्यात आले आहे.



### पवारांच्या अपघाती मृत्यूनंतर लंके आणि मिटकरींचा आक्रोश

**बारामती, ता. २९ :** राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांचं विमान अपघातात निधन झालं. २८ जानेवारी रोजी सकाळी ही घटना घडली. अजित पवार हे एका खासगी विमानाने मुंबईवरून बारामतीला जात असताना विमानाच्या लँडिंग दरम्यान विमानाचा अपघात झाला. या अपघातामध्ये अजित पवार यांच्यासह सहा जणांचा मृत्यू झाला आहे.

अजित पवार यांच्या अपघाती निधनामुळे अनेक कार्यकर्त्यांच्या डोळ्याच्या कडा पाणावल्या आहेत. अनेक नेते ढसाढसा रडत आहेत. राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) पक्षाचे आमदार अमोल मिटकरी आणि खासदार निलेश लंकेयांनी तर आक्रोश करत टाहो फोडला आहे. अमोल मिटकरी आणि निलेश लंके या दोघांचाही आक्रोश मन हेलावून टाकणारा होता. अजित पवार यांचं अंतिम दर्शन घेतल्यानंतर निलेश लंकेआणि अमोल मिटकरी ढसाढसा रडले आहेत.

**सुप्रिया सुळे ढसाढसा रडल्या**

अजित पवार यांच्या अपघाती मृत्यूनंतर सुप्रिया सुळे, शरद पवार, सुनेत्रा पवार हे सगळे दिल्लीहून बारामतीत पोहोचले. बारामतीत पोहोचताच सुप्रिया सुळे, सुनेत्रा पवार हे ढसाढसा रडल्या. सुप्रिया सुळे या विठ्ठलदादा मणियार यांच्या गळ्यात पडून रडल्या. यावेळी सुप्रिया सुळे यांनी अजितदादांचा उल्लेख तुमचा एकदम लाडला असा उल्लेख केला. यानंतर त्या मणियार यांच्या गळ्यात पडून रडल्या. सुनेत्रा पवार यांना देखील अश्रू थांबवता आले नाहीत.

## उड्डाणानंतर काही मिनिटांतच विमानाला अपघात; खासदारासह १५ जणांचा मृत्यू

**कोलंबिया, ता. २९ :** अजित पवार यांच्या विमानाला अपघात झाल्याची घटना ताजी असतानाच आणखी एक विमान दुर्घटना समोर आली आहे. खासगी विमान कोसळून खासदारासह १५ जणांचा मृत्यू झाला आहे. मृतांमध्ये १३ प्रवासी आणि दोन क्रू मेंबर्सचा समावेश आहे. या घटनेमुळे एकच खळबळ उडाली आहे. मृतांमध्ये आगामी निवडणुकीतील एका उमदवाराचाही समावेश आहे.

कोलंबिया-व्हेनेझुएला सीमेवर ही घटना घडली. कोलंबिया-व्हेनेझुएला सीमेजवळील नॉर्टे दे सँटान्डर प्रांतात बुधवारी सॅटेना एअरलाइन्सचे बीचक्राफ्ट १९००डी हे व्यावसायिक विमान कोसळले. उड्डाणानंतर काही मिनिटांतच हा अपघात झाला. अपघातग्रस्त विमान कुकुटा येथून ओकानाकडे जात होते.



विमान कोलंबियाच्या नॉर्टे दे सँटान्डर प्रदेशातील कुकुटा येथून उड्डाण घेतले आणि दुपारी ओकाना येथे पोहोचणार होते. मात्र, लँडिंगच्या काही वेळआधी विमानाचा अचानक हवाई वाहतूक नियंत्रणाशी संपर्क तुटला. बराच वेळ संपर्क न झाल्यामुळे, अधिकाऱ्यांनी ताबडतोब शोध मोहीम सुरू केली. शोधमोहिमे दरम्यान व्हेनेझुएलाच्या सीमेजवळील एका दुर्गम आणि डोंगराळ भागात विमानाचे अवशेष सापडल्यानंतर अपघाताची पुष्टी झाली. यात विमानातील सर्व प्रवाशांचा मृत्यू झाला आहे. कोलंबियाच्या चेंबर ऑफ डेप्युटीजचे सदस्य डायोजेनेस क्विंटेरो आणि निवडणूक उमेदवार कार्लोस साल्सेडो यांचाही या अपघातात मृत्यू झाला. दोघेही आपापल्या राजकीय पक्षांसोबत या विमानातून प्रवास करत होते. या घटनेमुळे राजकीय वर्तुळात शोककळा पसरली आहे. घनदाट जंगल आणि हवामानात वारंवार होत असलेले बदल यामुळे शोध आणि बचाव कार्यात अडथळा येत होता. यामुळे घटनास्थळापर्यंत पोहोचण्यास विलंब झाल्याचे अधिकाऱ्यांनी सांगितले. अपघाताचे कारण अद्याप समजू शकले नाही. याबाबत तपास सुरू आहे.

## आर्थर रोड कारागृहात कैद्याचा पोलीस शिपायावर जीवघेणा हल्ला

**मुंबई, ता. २९ :** मुंबईतील प्रसिद्ध आर्थर रोड मध्यवर्ती कारागृहातून एक धक्कादायक घटना समोर आली आहे. कारागृहातील एका कैद्याने पोलीस कर्मचाऱ्यावर जीवघेणा हल्ला केल्यामुळे परिसरात मोठी खळबळ उडाली आहे. या हिंसक घटनेत पोलीस शिपाई वाघ हे जखमी झाले असून त्यांच्यावर उपचार सुरू असल्याची माहिती मिळत आहे. लोकेंद्र उदयसिंग रावत असे हल्ला करणाऱ्या आरोपीचे नाव आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, ही घटना कारागृहाच्या मुख्य प्रवेशद्वाराजवळील मोकळ्या जागेत घडली. आरोपी लोकेंद्र रावत हा अचानक तेथे तैनात असलेल्या पोलिसांच्या दिशेने बघून अर्वाच्य भाषेत शिवीगाळ करू लागला. परिस्थितीचे गांभीर्य ओळखून पोलीस शिपाई वाघ आणि त्यांच्या




सहकाऱ्यांनी रावतला शांत करण्याचा व त्याला समजावण्याचा प्रयत्न केला. मात्र, संतापलेल्या रावतने पोलिसांचे ऐकण्याऐवजी अधिकच आक्रमक पवित्रा घेतला आणि थेट शिपाई वाघ यांच्यावर प्राणघातक हल्ला चढवला.

यावेळी तिथे उपस्थित असलेल्या इतर पोलीस कर्मचाऱ्यांनी मध्यस्थी करून वाद सोडवण्याचा प्रयत्न केला असता, आरोपीने त्यांनाही धक्काबुक्की केली आणि सरकारी कामात अडथळा निर्माण केला. या अनपेक्षित हल्ल्यामुळे कारागृह प्रशासनात एकच धावपळ उडाली. या गंभीर प्रकारानंतर आरोपी लोकेंद्र रावत विरुद्ध संबंधित पोलीस ठाण्यात विविध कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. कारागृहासारख्या सुरक्षित ठिकाणी पोलिसांवरच हल्ला झाल्याने कैद्यांच्या सुरक्षेचा आणि शिस्तीचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे. पोलीस या प्रकरणाचा अधिक तपास करत आहेत.

## ऐरोली परिसरात महिलेचा मोबाईल हॅक करून २१ लाख रुपये लांबविले

**नवी मुंबई, ता. २९ :** नवी मुंबईतील ऐरोली परिसरात ऑनलाईन खरेदीच्या नावाखाली एका महिलेची मोठी आर्थिक फसवणूक झाल्याची घटना समोर आली आहे. शॉपिंग ॲपचा वापर करताना मोबाईलचा ॲक्सेस दिल्यामुळे आरोपीने महिलेचा मोबाईल हॅक करून तिच्या बँक खात्यातील रक्कम परस्पर वळवली. या प्रकरणी रबाळे पोलीस ठाण्यात अज्ञात व्यक्तीविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.




पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, ऐरोली येथे राहणारी ही महिला ऑनलाईन खरेदीसाठी एका प्रसिद्ध शॉपिंग ॲपचा वापर करत होती. काही वस्तू खरेदी करत असताना संबंधित ॲपवरील व्यक्तीने व्यवहार पूर्ण करण्यासाठी मदतीचे कारण देत मोबाईलचा ॲक्सेस मागितला. विश्वास ठेऊन महिलेने मोबाईलचा ॲक्सेस दिल्यानंतर आरोपीने तिचा मोबाईल ताब्यात घेऊन हॅक केला.

मोबाईल हॅक केल्यानंतर आरोपीने महिलेच्या बँक खात्यातून टप्प्याटप्प्याने पैसे काढण्यास सुरुवात केली. तपासात समोर आलेल्या माहितीनुसार, १९ जून ते २२ जून २०२५ या कालावधीत आरोपीने महिलेच्या खात्यातून एकूण २१ लाख ३८ हजार ६०० रुपये स्वतः च्या खात्यात वळवले. सुरुवातीला खात्यातून रक्कम कमी होत असल्याचे महिलेला लक्षात आले नाही.


काही दिवसांनी बँक खात्याचा तपशील तपासल्यानंतर मोठ्या प्रमाणात रक्कम गायब झाल्याचे दिसून आले. आपली फसवणूक झाल्याचे लक्षात येताच पीडित महिलेने तातडीने सायबर गुन्हे शाखेकडे ई-मेलद्वारे तक्रार दाखल केली. या तक्रारीच्या आधारे रबाळे पोलिसांनी बुधवारी उशिरा रात्री अज्ञात व्यक्तीविरोधात फसवणुकीचा गुन्हा नोंदवला.

या प्रकरणाचा पुढील तपास सायबर पोलिसांकडून सुरू असून आरोपीचा शोध घेतला जात आहे. दरम्यान, पोलिसांनी नागरिकांना ऑनलाईन खरेदी किंवा आर्थिक व्यवहार करताना सावध राहण्याचे आवाहन केले आहे. कोणालाही मोबाईलचा ॲक्सेस, ओटीपी, बँक तपशील किंवा वैयक्तिक माहिती देऊ नये, असे स्पष्ट निर्देश पोलिसांनी दिले आहेत.

# वाघोलीत मद्यधुंद स्कूल बस चालकाकडून ४ दुचाकी व कारला उडवले

**पुणे, ता. २९ :** पुण्यात विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेबाबत गंभीर प्रश्न निर्माण करणारी धक्कादायक घटना समोर आली आहे. वाघोली परिसरात मद्यधुंद अवस्थेत असलेल्या एका स्कूल बस चालकाने भरदिवसा चार दुचाकी आणि एका कारला धडक देत काही अंतर फरफटत नेल्याचा प्रकार घडला. ही घटना मंगळवारी दुपारी सुमारे पाऊणे तीन वाजण्याच्या सुमारास वाघोलीतील बायफ रोडवर घडली. सुदैवाने या अपघातात कोणतीही जीवितहानी किंवा गंभीर दुखापत झाली नसली, तरी परिस्थिती अत्यंत धोकादायक होती.

मिळालेल्या माहितीनुसार, बत्ता वसंत रसाळ (वय ५० वर्षे, रा. वाघोली) असे अटक करण्यात आलेल्या बस चालकाचे नाव आहे. तो इंडो स्कॉट ग्लोबल स्कूलच्या बसमधून सुमारे ३० ते ४० विद्यार्थ्यांना घरी



सोडण्यासाठी निघाला होता. याच दरम्यान त्याने नियंत्रण गमावत रस्त्यावरील दुचाकी आणि कारला धडक दिली. अपघातानंतरही बस न थांबवता काही वाहने फरफटत नेल्याने परिसरात एकच गोंधळ उडाला.

घटनेनंतर स्थानिक नागरिकांनी बसचा पाठलाग करत ओरड सुरू केला. अखेर चालकाने बस थांबवली. मद्यधुंद अवस्थेत बस चालवत असल्याचे लक्षात येताच संतप्त नागरिकांनी त्याला चोप दिला आणि पोलिसांच्या ताब्यात दिले. घटनास्थळी मोठी गर्दी जमली होती. याप्रकरणी पोलिस कर्मचारी प्रशांत भगवान धुमाळ (वय ३६) यांनी फिर्याद दाखल केली असून पोलिसांनी चालकाला अटक केली आहे.

या घटनेमुळे शाळा प्रशासन आणि वाहतूक यंत्रणेच्या हलगर्जीपणावर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे. विद्यार्थ्यांना वाहतूक करणाऱ्या वाहनांची नियमित तपासणी, चालकांची वैद्यकीय चाचणी आणि मद्यपानासंदर्भातील कठोर नियंत्रण प्रत्यक्षात किती प्रभावी आहे, यावर पुन्हा एकदा चर्चा सुरू झाली आहे. सुदैवाने मोठी दुर्घटना टळली असली, तरी अशा निष्काळजीपणामुळे भविष्यात गंभीर परिणाम होऊ शकतात, अशी तीव्र प्रतिक्रिया नागरिकांकडून व्यक्त होत आहे.

# पुण्यात सायबर चोरट्याकडून एकाची ५३ लाखांची फसवणूक

**पुणे, ता. २९ :** पुणे शहरात सायबर फसवणुकीचे प्रकार वाढत असून शेअर बाजारात गुंतवणुकीच्या नावाखाली मोठी आर्थिक फसवणूक झाल्याची घटना समोर आली आहे. अल्पावधीत जास्त परतावा मिळेल, असे आमिष दाखवून सायबर गुन्हेगारांनी ५१ वर्षीय व्यक्तीची ५३ लाख ८७ हजार रुपयांची फसवणूक केल्याचा प्रकार उघड झाला आहे. या प्रकरणी मुंढवा परिसरातील पीडित व्यक्तीने दिलेल्या तक्रारीनुसार पुणे सायबर पोलीस ठाण्यात अज्ञात व्यक्तींविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.




पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, ही फसवणूक १० नोव्हेंबर २०२५ ते २४ डिसेंबर २०२५ या कालावधीत घडली. या काळात सायबर गुन्हेगारांनी पीडित व्यक्तीशी संपर्क साधून शेअर बाजारात गुंतवणूक केल्यास मोठा नफा मिळवून देण्याचे आश्वासन दिले. सुरुवातीला विश्वास निर्माण करण्यासाठी काही बनावट नफ्याचे तपशील दाखवण्यात आले. त्यामुळे तक्रारदाराचा विश्वास बसला.

यानंतर गुन्हेगारांनी वेगवेगळ्या बँक खात्यांमध्ये पैसे भरण्यास सांगितले. गुंतवणूक वाढवली तर नफा जास्त मिळेल, असे सांगून वेळोवेळी रक्कम जमा करून घेतली. या भूलथापांना बळी पडून तक्रारदाराने एकूण ५३ लाख ८७ हजार रुपये विविध खात्यांमध्ये ट्रान्सफर केले.

काही दिवसांनी तक्रारदाराने नफ्यासह रक्कम परत मागितली असता आरोपींनी टाळाटाळ करण्यास सुरुवात केली. त्यानंतर संपर्क बंद करण्यात आला. आपली फसवणूक झाल्याचे लक्षात येताच पीडित व्यक्तीने सायबर पोलिसांकडे धाव घेत तक्रार दाखल केली. सायबर पोलिसांनी या प्रकरणाचा तपास सुरू केला असून संबंधित बँक खात्यांचा तपशील गोळा केला जात आहे. तसेच गुन्हेगारांचा डिजिटल माग काढण्याचे काम सुरू आहे. दरम्यान, शेअर बाजाराच्या नावाखाली सोशल मीडिया, टेलिग्राम किंवा व्हॉट्सपवर दिल्या जाणाऱ्या गुंतवणुकीच्या सल्ल्यांवर विश्वास ठेवू नये, असे आवाहन पोलिसांनी नागरिकांना केले आहे.

# उच्च शिक्षण संस्थांमध्ये समानतेला प्रोत्साहन देण्याचे नियम जाहीर

**दिल्ली, ता. २९ :** देशातील महाविद्यालये आणि विद्यापीठांमध्ये जातीय भेदभाव रोखण्यासाठी विद्यापीठ अनुदान आयोगाने युजीसी लागू केलेले नवे नियम अवघ्या काही दिवसांतच वादाच्या भोवऱ्यात अडकले. या नियमांविरोधात विद्यार्थी संघटना, शिक्षक संघ आणि सामाजिक संस्थांकडून तीव्र प्रतिक्रिया उमटत असतानाच आता सर्वोच्च न्यायालयाने या नियमांना तात्पुरती स्थगिती दिली आहे. त्यामुळे केंद्र सरकार आणि युजीसी दोघांनाही मोठा धक्का मानला जात आहे.




युजीसीने जानेवारी २०२६ मध्ये उच्च शिक्षण संस्थांमध्ये समानतेला प्रोत्साहनदेण्याचे नियम, २०२६ हेनवे नियम जाहीर केले होते. १३ जानेवारी २०२६ पासून हे नियम लागू करण्यात आले. एससी , एसटी , ओबीसी , दिव्यांग आणि महिलांवरील भेदभाव रोखणे, तसेच तक्रार निवारणाची यंत्रणा अधिक कडक करणे हा यामागचा उद्देश असल्याचे युजीसीचे म्हणणे होते. मात्र, प्रत्यक्षात या नियम ंमुळे विद्यापीठांमध्ये वेगवेगळ्या प्रवर्गांसाठी स्वतंत्र यंत्रणा, समित्या आणि प्रक्रियांची रचना होईल, ज्यातून अप्रत्यक्षपणे नवीन भेद निर्माण होतील, अशी भीती व्यक्त केली गेली.

या पार्श्वभूमीवर सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल करण्यात आली. सुनावणीदरम्यान न्यायालयाने महत्त्वाची टिप्पणी करताना सांगितले की, संविधान सर्व नागरिकांना समान संरक्षण देते. केवळ काही प्रवर्गांसाठी स्वतंत्र नियम तयार केल्यास सेग्रिगेशन म्हणजेच वेगळेपणाला खतपाणी घातले जाऊ शकते. न्यायालयाने नियमांमुळे भविष्यात एससी , एसटी , ओबीसी साठी स्वतंत्र वसतिगृहे किंवा वेगळी रचना निर्माण होण्याची शक्यता व्यक्त करत चिंता नोंदवली आणि नियमांच्या अंमलबजावणीला स्थगिती दिली.

या नियमांनुसार प्रत्येक शैक्षणिक संस्थेला इक्विटी कमिटी, इक्वल ऑपॉर्च्युनिटी सेंटर, इक्विटी स्क्वॉड आणि २४७ हेल्पलाइन सुरू करणे बंधनकारक होते. तक्रार आल्यानंतर २४ तासांत प्राथमिक कारवाई आणि १५ दिवसांत अहवाल देणे अपेक्षित होते. भेदभावाची व्याख्या अधिक व्यापक करण्यात आली होती आणि नियमांचे उल्लंघन झाल्यास संस्थेची मान्यता रद्द करण्यापर्यंतची तरतूद करण्यात आली होती. हे २०१२ च्या नियमांचे सुधारित रूप होते, ज्यात ओबीसी प्रवर्गाचा स्पष्ट समावेश करण्यात आला होता.

हा मुद्दा केवळ कायदेशीर नाही, तर उच्च शिक्षणातील समानता, समावेशन आणि सामाजिक सलोखा यांच्याशी थेट जोडलेला आहे. न्यायालयाच्या हस्तक्षेपामुळे आता केंद्र सरकारने या नियमांचा नव्याने विचार करावा, सर्व घटकांचे मत ऐकावे आणि संविधानिक समतोल राखणारी स्पष्ट चौकट तयार करावी, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

# लोणी काळभोर येथे महिलेला रस्त्यावरच बेदम मारहाण

**लोणी काळभोर, ता. २८ :** पुणेसोलापूर राष्ट्रीय महामार्गालगत असलेल्या सेवा रस्त्यावर भर सायंकाळी एका महिलेला रस्त्यावरच बेदम मारहाण केल्याची धक्कादायक घटना घडली असून, या प्रकारामुळे संपूर्ण लोणी काळभोर परिसरात संतापाची लाट उसळली आहे. ही घटना लोणी काळभोर (ता. हवेली) ग्रामपंचायत हद्दीतील माळी मळा परिसरात बुधवारी (ता. २८) सायंकाळी साडेसहा वाजण्याच्या सुमारास घडली.



प्रत्यक्षदर्शींनी दिलेल्या माहितीनुसार, एका अज्ञात व्यक्तीने महिलेला शिवीगाळ करत सार्वजनिक ठिकाणी मारहाण केली. महिलेला लाथाबुक्क्यांनी व हाताने बेदम मारले जात असताना परिसरातील नागरिकांनी आरडाओरडा केला. मात्र, भरवस्तीत व वर्दळीच्या रस्त्यावर हा प्रकार घडूनही संबंधित मारहाण करणाऱ्याला कोणतीही भीती नसल्याचे दिसून आले. काही काळानंतर आरोपी घटनास्थळावरून फरार झाला.

या घटनेत संबंधित महिला गंभीर जखमी झाल्याची माहिती असून, तिला तातडीने उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्यात आल्याचे समजते. मात्र, या प्रकरणातील महिला तसेच मारहाण करणाऱ्या व्यक्तीची ओळख अद्याप स्पष्ट झालेली नाही.

विशेष म्हणजे, पुणेसोलापूर राष्ट्रीय महामार्गालगत वारंवार अनुचित प्रकार घडत असताना पोलीस यंत्रणा नेमकी काय करत आहे, असा सवाल नागरिक उपस्थित करत आहेत. महिलांच्या सुरक्षिततेबाबत मोठमोठ्या घोषणा करणाऱ्या यंत्रणा प्रत्यक्षात मात्र अशा घटनांकडे दुर्लक्ष करत असल्याचा आरोप होत आहे.

घटना घडूनही उशिरापर्यंत ठोस कारवाई न झाल्याने नागरिकांमध्ये तीव्र नाराजी आहे. संबंधित आरोपीवर तात्काळ गुन्हा दाखल करून त्याला अटक करण्यात यावी, तसेच परिसरात पोलीस बंदोबस्त वाढवावा, अशी जोरदार मागणी स्थानिक नागरिकांकडून होत आहे. पोलिसांच्या पुढील कारवाईकडे आता सर्वांचे लक्ष लागले आहे.

## महिलांच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर

लोणी काळभोर परिसरात भरवस्तीत महिलेला रस्त्यावरच बेदम मारहाण झाल्याच्या घटनेमुळे महिलांच्या सुरक्षिततेबाबत गंभीर प्रश्न निर्माण झाले आहेत. सार्वजनिक ठिकाणी निर्भयपणे गुन्हा घडत असेल, तर महिलांनी सुरक्षित राहायचे कसे, असा संतप्त सवाल नागरिक उपस्थित करत आहेत.

# ७० हजार कोटींचे आरोप मागे घ्या, हीच खरी श्रद्धांजली!; दादांना मुखाग्नी अन् इकडे राऊतांचं ट्विट

**मुंबई, ता. २९ :** बारामतीत बुधवारी झालेल्या विमान अपघातात राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे निधन झाल्याची बातमी समोर येताच संपूर्ण महाराष्ट्रात शोककळा पसरली. गुरुवारी बारामतीच्या विद्या प्रतिष्ठान परिसरात त्यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार करण्यात आले. अंतिम दर्शनासाठी आणि शेवटचा निरोप देण्यासाठी राज्याच्या विविध भागांतून हजारोंचा जनसमुदाय बारामतीत दाखल झाला होता. राजकीय मतभेद बाजूला ठेवून अनेक नेते, कार्यकर्ते आणि सामान्य नागरिकांनी अजित पवार यांना श्रद्धांजली वाहिली.



या अंत्यसंस्काराला केंद्रीय गृहमंत्री अमित शाह, भाजपचे राष्ट्रीय अध्यक्ष जे. पी. नड्डा, केंद्रीय मंत्री नितीन गडकरी, रामदास आठवले, गोव्याचे मुख्यमंत्री प्रमोद सावंत यांच्यासह राज्य आणि देशातील अनेक ज्येष्ठ नेते उपस्थित होते. अजित पवार यांचे पुत्र पार्थ पवार आणि जय पवार यांनी मुखाग्नी दिला. अनेक वर्षे महाराष्ट्राच्या राजकारणात प्रभावी भूमिका बजावणाऱ्या नेत्याच्या जाण्याने बारामतीसह संपूर्ण राज्य हळहळलेले दिसत होते.

दरम्यान, अंत्यसंस्कारानंतर काही तासांतच ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांनी सोशल मीडियावरून भाजपवर तीव्र टीका केली. अजित पवार यांच्या निधनानंतर भाजपकडून राज्यातील प्रमुख दैनिकांमध्ये पूर्ण पानाच्या श्रद्धांजली जाहिराती प्रसिद्ध करण्यात आल्याचा उल्लेख करत राऊत यांनी या भूमिकेवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले. पानभर जाहिराती देऊन काय साध्य होणार? अजित पवारांवर भाजपने, पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि देवेंद्र फडणवीस यांनी केलेले ७० हजार कोटींच्या भ्रष्टाचाराचे आरोप मागे घेणे हीच खरी श्रद्धांजली ठरेल, असे त्यांनी आपल्या पोस्टमध्ये म्हटले.

या वक्तव्यामुळे राजकीय वातावरण पुन्हा तापण्याची शक्यता आहे. एकीकडे शोकाकुल वातावरण असताना, दुसरीकडे अजित पवार यांच्या राजकीय कारकिर्दीभोवती फिरणारे जुने आरोप आणि वाद पुन्हा चर्चेत आले आहेत. संजय राऊत यांच्या टीकेला भाजपकडून काय प्रत्युत्तर दिले जाते, याकडे आता राज्याचे लक्ष लागले आहे.




Printed & Published By Janardan Gowardhan Dandge on behalf of Pune Prime News Network and printed at SHREE SAMARTH PRINTERS, 686, SHIVGANGA CHAMBERS, SHOP NO. G1, BUDHWAR PETH PUNE, 411002, Maharashtra. and publishded at Shop no 201, Sunrise Complex, Pune-Solapur Road. loni kalbhor(station), Tal.: Haveli Dist.: Pune-412201 Maharashtra) Editor- Janardhan Dandge (Mo. No. 9922232222).

मुद्रक, प्रकाशक व संपादक : जनार्दन गोवर्धन दांडगे. हे दैनिक पुणे प्राईम न्यूज नेटवर्क करीता मुद्रक आणि प्रकाशक जनार्दन गोवर्धन दांडगे यांनी श्री स्वामी समर्थ प्रिंटर्स, ६८६, शिवगंगा चेंबर्स, शॉप नं. जी १, बुधवार पेठ, पुणे - ४११००२ महाराष्ट्र येथे मुद्रित केले व पुणे प्राईम न्यूज नेटवर्क, शॉप नं २०१, सनराईज कॉम्प्लेक्स, पुणे सोलापूर रोड, लोणी काळभोर (स्टेशन), ता. हवेली, जि. पुणे- ४१२२०१ येथे प्रकाशित केले. 'पुणे प्राईम न्यूज' मधील लेखांचे हक्क राखून ठेवले आहेत. पुणे प्राईम न्यूज हे 'पुणे प्राईम न्यूज नेटवर्क'चे व्यापारचिन्ह आहे. (पीआरबी कायद्यानुसार जबाबदारी), दूरध्वनी : ९९२२२३२२२२, E Mail: puneprimenewsgmail.com.

# व्याजाच्या तगाद्याला कंटाळून व्यावसायिकाचा आत्महत्येचा प्रयत्न

## उरुळी कांचन पोलीस ठाण्यात चार सावकारांवर गुन्हा दाखल

**उरुळी कांचन, ता. २९ :** अवैध सावकारी, अमानुष व्याजदर, मारहाण, बंदुकीचा धाक आणि जबरदस्तीने जमीन बळकावण्याचा धक्कादायक प्रकार उरुळी कांचन परिसरात उघडकीस आला असून, या छळाला कँटाळून एका तरुण व्यावसायिकाने सोरतापवाडी (ता. हवेली) येथील कार्यालयात विष प्राशन करून आत्महत्येचा प्रयत्न केल्याची गंभीर घटना समोर आली आहे. या प्रकरणी उरुळी कांचन पोलीस ठाण्यात चार जणांविरोधात गंभीर स्वरूपाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

महादेव विठ्ठल जरांडे (वय ३६,रा. स्वरगंधार सोसायटी, उरुळी कांचन) असे पीडिताचे नाव आहे. सध्या ते कोरेगाव मूळ येथील चिंताम णी हॉस्पिटलमध्ये आयसीयूमध्ये उपचार घेत असून, मृत्यूशी झुंज देत असतानाच त्यांनी पोलिसांसमोर थरकाप उडवणारा जबाब नोंदविला आहे. त्यानुसार आनंता पवार, म ाऊली पवार, दिपाली साळुंखे आणि विजय पांडुरंग गोते यांच्यावर उरुळी कांचन पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, हडपसर येथील आनंता व माऊली पवार यांनी व्यवसायात गुंतवणुकीच्या नावाखाली सुरुवातीला रक्कम दिली. मात्र, या पैशांचे रूपांतर लवकरच अवैध सावकारीतझाले.८ते१०टक्के मासिक व्याज, वेळेवर पैसे न दिल्यास दुप्पट व्याज, रोजचा फोनवरून व प्रत्यक्ष तगादा आणि उघड धमक्या देणे असा छळ सुरू झाला. धक्कादायक बाब म्हणजे, एकूण ५३.८९ लाख रुपये घेतल्यानंतरही पीडिताने ५५ लाख रुपये मुद्दल आणि तब्बल ६०.४१ लाख रुपये व्याजापोटी दिले, तरीही सावकारांची लालसा संपली नाही.

व्याज वसुलीच्या नावाखाली आरोपींनी पीडिताच्या दुकानासमोर उभ्या असलेल्या तब्बल १२ जुन्या चारचाकी गाड्या जबरदस्तीने पळवून नेल्या. एवढ्यावरच न थांबता, त्याला मारहाण करून जबरदस्तीने वेगवेगळ्या ठिकाणी नेण्यात आले. डिसेंबर २०२५मध्ये तर कळस गाठला. आरोपींनी बंदुकीचा धाक दाखवून, पीडित व त्याच्या भावाच्या नावावरील कोरेगाव मूळ येथील ३ गुंठे जमीन जबरदस्तीने दिपाली साळुंखे यांच्या नावावर करून घेण्यात आली, असा गंभीर आरोप आहे.

या सततच्या मानसिक, आर्थिक आणि शारीरिक छळाने महादेव जरांडे पूर्णपणे कोलमडले. अखेर २६ जानेवारी २०२६ रोजी त्यांनी विषारी औषध प्राशन करून आत्महत्येचा प्रयत्न केला. वेळीच उपचार मिळाल्याने जीव वाचला, मात्र हा प्रयत्न सावकारीच्या दहशतीची भीषणता अधोरेखित करणारा ठरतो.

दरम्यान, या प्रकरणी चौघांविरोधात अवैध सावकारी, मारहाण, धमकी, जबरदस्ती, फसवणूक व आत्महत्येस प्रवृत्त केल्याचे गंभीर गुन्हे दाखल झाले आहेत. तरीही प्रश्न कायम आहे. अवैध सावकारीचा हा विळखा आणखी किती निष्पाप जीव घेणार? आरोपींवर कठोर कारवाई कधी होणार? नागरिकांच्या नजरा आता पोलिस प्रशासनाच्या पुढील भूमि केकडे लागल्या आहेत.

## रावेत परिसरात माथाडीच्या नावाखाली खंडणीची मागणी

**रावेत, ता. २९ :** बांधकाम साईटवर स्टील उतरवण्याचे काम करणाऱ्या कामगारांना आम्ही रेकॉर्डवरचे गुन्हेगार आहोत. आम्ही रावेत परिसरात माथाडी करतो, अशी धमकी देत खंडणी मागणाऱ्या तिघांना पोलिसांनी अटक केली आहे. ही घटना सोमवारी २६ जानेवारी सकाळी साडेअकरा वाजता रावेत येथे घडली. या प्रकरणी ३६ वर्षीय व्यक्तीने रावेत पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यानुसार पोलिसांनी कासीम मौला म ुर्शद (२७, निगडी), अविनाश अर्जुन नाटेकर (२४, निगडी) आणि अनिस खाजाहुसेन शेख (२८, चिंचवड) या तिघांना अटक केली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, फिर्यादी आणि त्यांचे सहकारी गाडीतून स्टील खाली करत असताना आरोपी तिथे आले. त्यांनी आम्ही रेकॉर्डवरचे गुन्हेगार आहोत. आम्ही रावेत परिसरात माथाडी करतो, असे सांगून कामाच्या मोबदल्यात पैशांची मागणी केली.

## प्राईम लाईफ

## नळाचं पाणी की फिल्टरचं? तुमच्या आरोग्यासाठी नक्की कोणतं चांगलं



पाणी हे जीवन आहे, पण तेच पाणी जर चुकीच्या पद्धतीने प्यायलं तर ते अनेक आजारांना निमंत्रण देऊ शकतं. आज प्रत्येक घरात 'वॉटर फिल्टर' किंवा 'आरो' मशीन दिसतं. पण दुसरीकडे, आजही आपली मोठी लोकसंख्या नळाचं पाणी पिते. मग प्रश्न पडतो की, नक्की कोणतं पाणी आरोग्यदायी आहे?

नळाचं पाणी: खरंच सुरक्षित आहे का?
महानगरपालिका किंवा ग्रामपंचायतीद्वारे पुरवलं जाणारं पाणी हे प्रक्रिया करूनच सोडलं जातं. यात प्रामुख्याने क्लोरीनचा वापर करून जंतू नष्ट केले जातात.

फायदे : या पाण्यात नैसर्गिक खनिजे जसे की, कॅल्शियम आणि मॅग्नेशियम टिकून असतात.

धोका: पाण्याचे मुख्य स्त्रोत शुद्ध असले तरी, आपल्या घरापर्यंत येणाऱ्या गंजलेल्या पाईपलाईन्स किंवा अस्वच्छ टाक्यांमुळे पाण्यात लेड (शिसे), गंज आणि घातक बॅक्टेरिया मिसळण्याची शक्यता असते.

फिल्टर/आरो पाणी: आधुनिक काळाची गरज की फॅड?

आजकाल 'रिव्हर्स ऑस्मोसिस' (आरो) तंत्रज्ञान लोकप्रिय आहे. हे पाणी दिसायला अत्यंत स्वच्छ आणि चवीला गोड लागते.

फायदे : हे पाणी जड धातू, फ्लोराईड आणि आर्सेनिकसारखे घातक घटक पूर्णपणे काढून टाकतं. दूषित पाण्याचा धोका असलेल्या भागांसाठी हे उत्तम आहे.

धोका: तज्ज्ञांच्या मते, आरो फिल्टर केवळ घाणच काढत नाही, तर शरीराला आवश्यक असलेली नैसर्गिक खनिजेही काढून टाकतो. याला 'डेड वॉटर' असंही म्हटलं जातं. सतत असं पाणी प्यायल्याने सांधेदुखी, व्हिटॅमिन बी१२ची कमतरता आणि थकवा जाणवू शकतो.

तज्ज्ञांचा सल्ला: तुम्ही काय करावं?

केवळ जाहिराती पाहून फिल्टर लावण्यापेक्षा तुमच्या भागातील पाण्याचा टी डी एस तपासा.

१) ५० ते १५० मिलि ग्रॅम /लीटर (उत्तम नैसर्गिक पाणी).

स्थिती: हे पाणी पिण्यासाठी अतिशय चांगले आणि चवीला नैसर्गिक असते.

उपाय: महागड्या मशीनची गरज नाही. पाणी २० मिनिटे उकळून पिणे पुरेसे आहे.

२) १५० ते ३० मिलि ग्रॅम /लीटर (मध्यम प्रकारचे पाणी)

स्थिती : यात खनिजांचे प्रमाण संतुलित असते.

उपाय : साध्या यू व्ही किंवा यू एफ फिल्टरचा वापर करा. हे बॅक्टेरिया मारतात पण खनिजे टिकवून ठेवतात.

३) ३०० ते ५०० मिलि ग्रॅम /लीटर (प्रमाणित पाणी)

स्थिती : हे पाणी पिण्यायोग्य असते पण चवीला थोडे जड लागू शकते.

उपाय : कार्बन फिल्टर असलेले प्युरिफायर वापरणे फायदेशीर ठरते.

४) ५०० मिलि ग्रॅम /लीटर पेक्षा जास्त (जड/खारे पाणी)

स्थिती : हे पाणी शरीरासाठी जड असते आणि किडनीवर ताण देऊ शकते.

उपाय : येथे आरो फिल्टरची अत्यंत गरज आहे. हे पाणी गोड आणि हलके करते.

तांब्याचं भांडं आणि उकळलेलं पाणी

दरम्यान, डॉक्टरांच्या मते, जर तुमच्याकडे फिल्टर नसेल, तर पाणी २० मिनिटे उकळणे हा सर्वात सुरक्षित उपाय आहे. तसेच, उकळलेले पाणी तांब्याच्या भांड्यात रात्रभर ठेवल्यास त्याचे गुणधर्म वाढतात आणि ते पचनासाठी हलकेहोते.

## पोलिस असल्याची बतावणी करून केनियातील महिलेचे ६६ लाख लुटले



**मुंबई, ता. २९ :** मुंबईतील फोर्ट परिसरात दिवसाढवळ्या घडलेल्या एका फसवणुकीच्या घटनेमुळे शहरात खळबळ उडाली आहे. स्वतःला पोलिस अधिकारी असल्याचे भासवून दोन अज्ञात व्यक्तींनी केनियातील एका महिला व्यापाऱ्याची मोठ्या रकमेची रोकड लंपास केल्याची घटना उघडकीस आली आहे. या प्रकरणी एमआरए मार्ग पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून आरोपींचा शोध सुरू आहे.

पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, मंगळवारी दुपारी फोर्ट येथील एम.जी. रोडवरील अलाना सेंटर इमारतीसमोर ही घटना घडली. सुमाया मोहम्मद आब्दी वय २६ ही महिला केनियातील नैरोबी येथे राहणारी असून ती लहान मुलांच्या कपड्यांचा व्यवसाय करते. व्यवसायासाठी ती २६ जानेवारी रोजी भारतात आली होती आणि मोहम्मद अली रोड परिसरातील एका हॉटेलमध्ये मुक्कामाला होती.

सोमवारी सकाळी सुमाया कपड्यांची खरेदी करण्यासाठी मोहम्मद अली रोड आणि कालबादेवी परिसरात गेली होती. या दरम्यान तिने आपल्या चार सहकारी मैत्रिणींना आधी खरेदी केलेल्या मालाच्या मोबदल्यात ५८ लाख रुपये रोख दिले होते. याशिवाय तिच्याकडे स्वतःचे ३ लाख ४५ हजार रुपये होते. एकूण ६६ लाख ४५ हजार रुपयांची रोकड दोन वेगवेगळ्या बॅगमध्ये ठेवण्यात आली होती. दुपारी सुमाया आणि तिची एक मैत्रीण टॅक्सीने कुलाब्यातील हॉटेलकडे निघाल्या असताना फोर्ट परिसरात एका दुचाकीस्वाराने टॅक्सी अडवली. दुचाकीवरील एका व्यक्तीने स्वतःला पोलिस असल्याचे सांगत तपासणी सुरू केली. टॅक्सी चालक खाली उतरताच दुसऱ्या आरोपीने मागील सीटवर बसलेल्या महिलांकडील बॅगची चौकशी केली. भीती आणि दबावामुळे महिलांनी रोकड असलेली बॅग आरोपींकडे दिली. पोलिस ठाण्यात घेऊन जातो असे सांगून आरोपी दुचाकीवरून पसार झाले. दरम्यान, घटनेनंतर घाबरलेल्या महिला थेट हॉटेलमध्ये पोहोचल्या. त्यानंतर टॅक्सी चालकाने पोलिसांना माहिती दिली. पोलिसांनी घटनास्थळी भेट देऊन तपास सुरू केला असून परिसरातील सीसीटीव्ही फुटेजच्या आधारे आरोपींचा शोध घेतला जात आहे.

## विधी व एमबीएच्या परीक्षा पुढे ढकलल्या; ३ फेब्रुवारीला होणार पेपर



**पुणे, ता. २९ :** महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या निधनामुळे संपूर्ण राज्यात शोककळा पसरली असून, त्यांच्या अंत्यसंस्कारासाठी बारामती येथे होणारी अलोट गर्दी लक्षात घेता सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने एक मोठा निर्णय घेतला आहे. आज, गुरुवारी (२९ जानेवारी) होणाऱ्या विधी आणि एमबीए अभ्यासक्रमांच्या सर्व परीक्षा तातडीने पुढे ढकलण्यात आल्या आहेत.

विद्यापीठाच्या परीक्षा व मूल्यम ापन मंडळाचे संचालक डॉ. प्रभाकर देसाई यांनी दिलेल्या माहितीनुसार, अजित पवार यांना अखेरचा निरोप देण्यासाठी संपूर्ण महाराष्ट्रातून मोठा जनसमुदाय बारामतीच्या दिशेने येण्याची शक्यता आहे. बारामती तालुक्यातील अनेक शैक्षणिक संस्थांनी आज बंद पाळण्याचा निर्णय घेतला आहे. अशा परिस्थितीत विद्यार्थ्यांची गैरसोय होऊ नये, वाहतूक कोंडी किंवा इतर तांत्रिक अडचणींमुळे कोणाचाही पेपर चुकू नये, या उद्देशाने विद्यापीठाने दोन्ही सत्रांतील परीक्षा रद्द करण्याचा निर्णय घेतला आहे.

आज रद्द झालेले हे पेपर आता ३ फेब्रुवारी २०२६ रोजी घेतले जातील. इतर अभ्यासक्रमांच्या परीक्षांबाबतचे सविस्तर फेर-वेळापत्रक पुढील दोन दिवसांत विद्यापीठाच्या अधिकृत संकेतस्थळावर प्रसिद्ध केले जाईल.

## मावळच्या माजी आमदार रुपलेखा ढोरे यांचे निधन



**पुणे, ता. २९ :** मावळ तालुक्याच्या राजकारणात आपला वेगळा ठसा उमटवणाऱ्या आणि महिला नेतृत्वाचा पाया रचणाऱ्या माजी आम दार रुपलेखाढोरे (वय ७६ ) यांचे बुधवारी अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या जाण्याने मावळने एक अभ्यासू आणि तितकीच कणखर लोकप्रतिनिधी गमावली आहे. रुपलेखा ढोरे यांचा राजकीय प्रवास पंचायत समितीपासून सुरू झाला असला, तरी १९९५ ची विधानसभा निवडणूक त्यांच्या आयुष्यातील सुवर्णक्षण ठरली. त्या काळात पती खंडेराव ढोरे यांच्यासह त्यांनी काँग्रेसला सोडचिठ्ठी देऊन भारतीय जनता पक्षात प्रवेश केला. भाजपने त्यांना उमेदवारी दिली आणि त्यांनी तत्कालीन दिग्गज नेते मदनशेठ बाफना यांचा पराभव करूनओळख निर्माण केली. या विजयामुळे त्या मावळच्या पहिल्या महिला आमदार आणि भाजपच्याही मावळमधील पहिल्या आमदार ठरल्या. ग्रामीण भागातील महिलांचे प्रश्न सोडवण्यासाठी त्यांनी आयुष्य वेचले. त्यांच्या निधनानंतर दोन मुले, दोन मुली आणि नातवंडांचा मोठा परिवार पोरका झाला आहे. त्यांच्या निधनाची बातमी समजताच संपूर्ण मावळ तालुक्यात व्यापार आणि व्यवहार बंद ठेवून त्यांना श्रद्धांजली वाहण्यात आली.

## फास्टॅगमध्ये १ फेब्रुवारी २०२६ पासून केवायसी पडताळणी रद्द




**पुणे, ता. २९ :** देशातील लाखो वाहनचालकांसाठी दिलासादायक बातमी आहे. नॅशनल हायवे ऑथोरिटी ऑफ इंडिया ने फास्टॅग वापरासंदर्भातील एक महत्त्वाचा नियम बदलण्याचा निर्णय घेतला आहे. १ फेब्रुवारी २०२६ पासून कार, जीप आणि व्हॅनसाठी जारी होणाऱ्या फास्टॅग साठी आपले वाहन जाणून घ्या ही पडताळणी प्रक्रिया अनिवार्य राहणार नाही. त्यामुळे फास्टॅग ॲक्टिव्हेशन मध्ये होणारा उशीर, तांत्रिक अडचणी आणि टोल प्लाझावरचा वाद मोठ्या प्रमाणात कमी होण्याची अपेक्षा आहे.

आतापर्यंत फास्टॅगयोग्य आहे का, तो ड्युप्लिकेट तर नाही ना, याची खात्री करण्यासाठी केवायसी प्रक्रिया केली जात होती. मात्र अनेकदा सर्व्हर डाऊन, डेटामॅच न होणे किंवा कागदपत्रांच्या त्रुटींमुळे ही प्रक्रिया रखडायची. परिणामी फास्टॅग ॲक्टिव्ह होण्यास उशीर, टोलवर अडथळे आणि बँक व कस्टमर केअरकडे तक्रारी वाढत होत्या.


या पार्श्वभूमीवर नॅशनल हायवे ऑथोरिटी ऑफ इंडियाने केवायसी ची जबाबदारी थेट बँकांकडे सोपवण्याचा निर्णय घेतला आहे. आता फास्टॅग जारी करणाऱ्या बँकाच वाहनाची माहिती तपासणार आहेत. ही पडताळणी वाहनाच्या आरसी आणि अधिकृत वाहन डेटाबेसच्या आधारे केली जाईल. त्यामुळे वाहनधारकांना वेगळी केवायसी प्रक्रिया पूर्ण करण्याची गरज भासणार नाही.

महत्त्वाचे म्हणजे, आधीच जारी करण्यात आलेल्या फास्टॅग साठीही सक्तीची केवायसी प्रक्रिया मोठ्या प्रमाणात रद्द होणार आहे. केवळ काही विशेष प्रकरणांमध्येच अतिरिक्त पडताळणी केली जाऊ शकते. एकूणच, हा निर्णय फास्टॅग प्रणाली अधिक सोपी, जलद आणि वाहनचालक-मैत्रीपूर्ण बनवणारा ठरणार आहे.

### या बदलाचे फायदे काय?

- फास्टॅग मिळण्यात होणारा उशीर टळेल
- टॅग घेताच तो लगेच वापरता येईल
- कागदपत्रांचा आणि तांत्रिक प्रक्रियांचा त्रास कमी होईल
- टोल प्लाझावरचा वेळ, वाद आणि गोंधळ कमी होईल

## वैमानिकांचं शेवटचं संभाषण आणि तांत्रिक बिघाडाचं सत्य येणार समोर



**बारामती, ता. २९ :** महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या निधनाने राजकारणातील एका झंझावाती पर्वाचा अंत झाला आहे. मुंबईहून बारामतीच्या दिशेने निघालेले 'लिअरजेट ४५' हे चार्टर्ड विमान लँडिंगच्या अवघ्या काही सेकंद आधी कोसळलं. बुधवारी (ता. २८) सकाळी ८ .४५ च्या सुमारास घडलेल्या या घटनेने संपूर्ण देश सुन्न झाला आहे.

मुंबईहून उड्डाण केल्यानंतर सर्व काही सुरळीत होते. मात्र, बारामतीच्या आकाशात पोहोचताच दाट धुकेआणि अत्यंत कमी दृश्यमानतेने वैमानिकांसम ोर आव्हान उभे केले. बारामती विम ानतळ हे लहान असून तिथे 'इन्स्ट्रुमेंट लँडिंग सिस्टम' उपलब्ध नाही, त्यामुळे सर्वस्वी 'मॅन्युअल लँडिंग'वर अवलंबून राहावे लागते.

वैमानिकाने लँडिंगचा पहिला प्रयत्न अयशस्वी ठरल्याने विमान पुन्हा हवेत घेतले. दुसऱ्या प्रयत्नावेळी विमानाने 'मे-डे' हा आणीबाणीचा संदेश दिला, पण अवघ्या १०० फुट उंचीवर असताना विमानाचा तोल गेला आणि ते धावपट्टीच्या बाजूला जमिनीवर आदळले. मोठा स्फोट होऊन विमानाने पेट घेतल्याने कोणालाही वाचवण्याची संधी उरली नाही. तपास यंत्रणांच्या हाती आता विमानाचा 'ब्लॅक बॉक्स' लागला असून, तो या गूढ अपघाताचे रहस्य उलगडणार आहे. यातविमानाचा वेग, इंजिनची स्थिती आणि उंचीची तांत्रिक माहिती दडलेली असते. यात वैमानिकांचे एकमेकांशी झालेले संभाषण आणि एअर ट्रॉफिक कंट्रोलरशी झालेला संवाद रेकॉर्ड असतो. यातून मानवी चूक होती की तांत्रिक बिघाड, हे स्पष्ट होईल. एका महत्त्वाच्या निवडणुकीच्या उंबरठ्यावर असताना हा अपघात होणे, हे राज्याच्या भविष्यासाठी मोठे नुकसान आहे. सध्या 'विमान अपघात तपास ब्युरो' यावर सखोल तपास सुरु आहे.

## मृत्यूपूर्वीच्या मेसेजमुळे प्रेयसीवर गुन्हा दाखल; मुंबई येथील घटना





**मुंबई, ता. २९ :** मुंबईतील ट्रॉम्बे परिसरात एका तरुणाने आत्म हत्या केल्याची घटना समोर आली असून या घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त केली जात आहे. प्रेयसीसोबत झालेल्या वादानंतर तरुणाने हे टोकाचे पाऊल उचलल्याची माहिती प्राथमिक तपासात पुढे आली आहे. या प्रकरणी ट्रॉम्बे पोलिसांनी अपमृत्यूची नोंद करून तपास सुरू केला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, संबंधित तरुण मूळचा अँटॉप हिल परिसरातील रहिवासी होता. तो काही दिवसांपूर्वी आपल्या काकांकडे राहण्यासाठी ट्रॉम्बे येथील चित्ता कॅम्प परिसरात गेला होता. त्या दरम्यान त्याची ओळख एका १८ वर्षांच्या तरुणीसोबत झाली. ओळखीनंतर काही दिवसांत दोघांमध्ये जवळीक वाढली आणि त्यांचे नाते प्रेमात रूपांतरित झाले. दोघेही नियमित संपर्कात होते आणि भेटीगाठी होत होत्या. मात्र काही दिवसांपूर्वी दोघांम ध्ये वाद सुरू झाल्याची माहिती आहे. या वादामुळे तरुण मानसिक तणावात असल्याचे सांगण्यात येत आहे. १४ डिसेंबर रोजी तो काकांकडे मुक्कामाला असताना पुन्हा एकदा प्रेयसीसोबत वाद झाला. त्या रात्रीच तरुणाने आत्महत्या केल्याचे उघड झाले.

घटनेनंतर तरुणाच्या आईला त्याच्या मोबाइल फोनमध्ये एक नोट आढळून आली. या नोटमध्ये प्रेयसीसोबत होत असलेल्या सततच्या वादांचा उल्लेख असल्याची माहिती आहे. ही बाब लक्षात येताच आईने ट्रॉम्बे पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली. तक्रारीच्या आधारे पोलिसांनी तपास सुरू केला असून संबंधित तरुणीविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांकडून या प्रकरणाचा सखोल तपास केला जात असून सर्व बाबींची चौकशी सुरू आहे. दरम्यान, या घटनेमुळे परिसरात शोककळा पसरली आहे. तरुणांनी कोणत्याही अडचणीच्या वेळी कुटुंबीयांशी किंवा विश्वासू व्यक्तींशी संवाद साधावा, असे आवाहन सामाजिक कार्यकर्त्यांकडून करण्यात येत आहे.

## महाराष्ट्रात १३ खतांच्या विक्री आणि उत्पादनावर सरकारने घातली बंदी



**मुंबई, ता. २९ :** महाराष्ट्रातील शेतीमध्ये पिकांच्या वाढीसाठी मोठ्या प्रमाणावर वापरल्या जाणाऱ्या 'जैव उत्तेजकांबाबत' राज्य सरकारने एक अत्यंत कठोर निर्णय घेतला आहे. कृषी आयुक्तालयाने राज्यातील १३ विशिष्ट जैव उत्तेजक उत्पादनांच्या विक्री, साठवणूक आणि निर्मितीवर संपूर्ण बंदी घातली आहे. केंद्र सरकारच्या आदेशानंतर तातडीने अमलात आलेल्या या निर्णयामुळे खत निर्मिती कंपन्या आणि कृषी सेवा केंद्रांमध्ये मोठी खळबळ उडाली आहे.

मुळात, खत नियंत्रण कायदा १९८५ अंतर्गत जैव उत्तेजकांना कायदेशीर मान्यता देण्यात आली होती. सुरुवातीला १५९ उत्पादनांना हिरवा कंदील मिळाला होता. मात्र, यातील काही उत्पादने प्राणिजन्य घटकांपासूनतयार केली जात असल्याचे समोर आले. शाकाहारी किंवा बिगर-कृषी संस्थांनी यावर आक्षेप घेत केंद्राकडे तक्रारींचा पाऊस पाडला. हा वाद धार्मिक किंवा सामाजिक वळण घेण्यापूर्वीच केंद्र सरकारने सखोल अभ्यासाऐवजी थेट 'खत नियंत्रण आदेशात' सुधारणा करून या १३ उत्पादनांना अधिकृत यादीतूनच बाहेर काढले आहे.

१. प्रोटिन हायड्रोलायसेट्स + सागरी अर्क : हे एक लिक्विड स्वरूपातील मिश्रण आहे.

२. प्रोटिन हायड्रोलायसेट्स + अँटीऑक्सिडंट्स एक्सट्रॅक्ट: लिक्विड स्वरूपातील मिश्रण.

३. प्रोटिन हायड्रोलायसेट्स + सागरी अर्क + ह्युमिक सिड: विविध घटकांचे लिक्विड मिश्रण.

४. प्रोटिन हायड्रोलायसेट्स + अमायनो सिड्स: लिक्विड स्वरूपातील तांत्रिक मिश्रण.

५. प्रोटिन हायड्रोलायसेट्स (६२.१ %): मुख्यत्वे प्राणिजन्य स्रोत असलेले उत्पादन.

६. प्रोटिन हायड्रोलायसेट्स ३६ .०४ %): प्राणिजन्य स्रोत असलेले उत्पादन.

७. प्रोटिन हायड्रोलायसेट्स (६२ .५ %) - उपगट : प्राणिजन्य स्रोत असलेले उत्पादन.

८. प्रोटिन हायड्रोलायसेट्स (४६.०९ %): प्राणिजन्य स्रोत असलेले उत्पादन.

९. प्रोटिन हायड्रोलायसेट्स (२९.३४ %): प्राणिजन्य स्रोत असलेले उत्पादन.

१०. प्रोटिन हायड्रोलायसेट्स (१२ %): प्राणिजन्य स्रोत असलेले उत्पादन.

११. प्रोटिन हायड्रोलायसेट्स (६८.३३ %): प्राणिजन्य स्रोत असलेले उत्पादन.

१२. प्रोटिन हायड्रोलायसेट्स (५४%): प्राणिजन्य स्रोत असलेले उत्पादन.

१३. प्रोटिन हायड्रोलायसेट्स (२७.० ५ %): प्राणिजन्य स्रोत असलेले उत्पादन.

दरम्यान, बंदी घालण्यात आलेल्या उत्पादनांमध्ये प्रामुख्याने प्रोटिन हायड्रोलायसेट्स, सागरी अर्क आणि अमायनो सिड्स यांच्या मिश्रणांचा समावेश आहे. आता परवाना प्रणालीत केवळ १४६ उत्पादनेच शिल्लक राहिली आहेत. दरम्यान, बंदी घातलेल्या उत्पादनांची निर्मिती, विक्री किंवा आयात करत नियमांचे उल्लंघन केल्यास कठोर कारवाई करण्यात येणार आहे.